# ऋणनिर्देश आणि भूमिका

**"साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्या : एक वाङ्मयीन अवलोकन"(१९६० ते २००७)** या विषयावर पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास प्रबंध सादर करीत असताना मला अतिशय मनस्वी आनंद होत आहे. हा विषय अतिशय व्यापक असूनही मी माझ्यापरीने या विषयाची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मे २००४ मध्ये एम.ए.च्या परीक्षेत पुणे विद्यापीठामध्ये सर्वप्रथम आल्यामुळे 'म.ना.अदवंत स्मृती सुवर्णपदक' मिळाल्यानंतरच 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्या : एक वाङ्मयीन अवलोकन' (१९६० ते २००७) या एका अतिशय वैविध्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण विषयावर पीएच्.डी. या पदवीसाठी संशोधन करण्याचे निश्चित केलेले होते.

साहित्य अकादमी ही अखिल भारतीय स्तरावरील स्वायत्त संस्था आहे. साहित्य अकादमी या संस्थेची स्थापना १२ मार्च, १९५४ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शुभहस्ते झालेली आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताची साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात भरभराट व्हावी या हेतूनेच साहित्य अकादमीची स्थापना केलेली आहे. साहित्य अकादमीने भारतातील प्रमुख २४ भाषांतील साहित्याच्या विकासाचा विडाच उचललेला आहे. साहित्य अकादमीमुळे भारतातील सांस्कृतिक आणि भाषिक भिन्नतेत एकता निर्माण होण्यास भरपूर मदत झालेली आहे. साहित्य अकादमीमुळे सर्व भाषांमधील लेखक, वाचक आणि समीक्षक यांचे अनुभवविश्व समृद्ध होण्यासाठीसुद्धा अतिशय मौलिक हातभार लाभलेला आहे. अखिल भारतीय स्तरावर मराठी साहित्याची व्यापकता आणि श्रेष्ठता तपासण्यासाठी साहित्य अकादमीचे बहुमोल सहकार्य लाभलेले आहे. तसेच साहित्य अकादमीमुळेच अखिल भारतीय स्तरावरील साहित्यामध्ये आदान-प्रदान होऊ लागलेले आहे. साहित्य अकादमीच्यावतीने दरवर्षी भारतातील २४ भाषांमधील निवडक सर्वोत्कृष्ट साहित्यकृतीस हा पुरस्कार दिला जातो. साहित्य अकादमीच्या ह्या बहुआयामी कार्यामुळे भाषिक व सांस्कृतिक एकसंधता निर्माण झालेली आहे. म्हणूनच मला साहित्य अकादमीच्या ह्या व्यापक आणि भव्य-दिव्य उपक्रमांची दखल घेणे महत्त्वाचे वाटल्यामुळेच हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त संपूर्ण मराठी साहित्याचा समग्रपणे अभ्यास करणे ही माझ्या आवाक्याबाहेरील बाब आहे. त्यामुळेच मराठी साहित्यातील कादंबरी या एका विशिष्ट वाङ्मयप्रकाराचा अभ्यास करणे मला औचित्याचे वाटल्यामुळेच **"साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्या : एक वाङ्मयीन अवलोकन" (१९६० ते २००७)** हा विषय पीएच्.डी.च्या संशोधनासाठी निवडलेला आहे. त्यातही विशेष महत्त्वाची बाब म्हणजे मराठी कादंबरीला नुकतेच २००७ मध्ये १५० वर्षे पूर्ण झालेली आहेत. तसेच

साहित्य अकादमीच्या स्थापनेलासुद्धा नुकतेच २०१४ मध्ये ६० वर्षे पूर्ण झालेली आहेत. हा एक दुग्धशर्करा अर्थात मणिकांचन योग आहे. म्हणूनच मी माझ्या पीएच्.डी.च्या प्रबंधासाठी कादंबरी हा वाङ्मयप्रकार निवडलेला आहे. परंतु कादंबरी ह्या वाङ्मयप्रकाराचासुद्धा आवाका फारच मोठा आहे. त्यामुळेच मला साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त झालेल्या मराठी कादंबऱ्यांचा अभ्यास करणे औचित्याचे वाटले. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील समाजाचे बदललेले वास्तव आणि कादंबरी या वाङ्मयप्रकारांनी घेतलेली झेप ह्या दोन्ही दृष्टीने हा अभ्यास हाती घेणे मला अत्यावश्यक वाटल्यामुळेच ह्या विषयाची माझ्यपरीने मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त सर्वोत्कृष्ट मराठी कादंबऱ्यांची निवड ही घटनाच मला फार कुतूहलजनक वाटते. या अभ्यासामुळेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कादंबरीचा इतिहास आणि मराठी कादंबरीच्या विकासातील टप्पे यांचे यथार्थ आकलन होण्यास निश्चितच मदत झालेली आहे.

मला या शोधप्रबंधासाठी मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ.भास्कर शेळके सर यांनी सर्व प्रकारचे मौलिक सहकार्य केलेले आहे. त्यांच्या या आपुलकीच्या अनमोल सहकार्यामुळेच माझ्या शोधप्रबंधाचे काम पूर्ण झालेले आहे. प्राचार्य डॉ.भास्कर शेळके सरांनी माझ्याकडून अधिकाधिक चांगले काम करवून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्राचार्य डॉ.भास्कर शेळके यांनी प्रत्येक वेळी हातातील कामे बाजूस सारून माझ्या प्रबंधातील सर्व प्रकरणे पूर्णपणे वाचून, आवश्यक त्या दुरूस्त्या सुचविलेल्या आहेत. माझ्या प्राथमिक स्वरूपाच्या प्रश्नांवर देखील त्यांनी वेळोवेळी चर्चा करून शंकांचे निरसन केलेले आहे. त्यांनी भरपूर वेळ देऊन जे विशेष सहकार्य केलेले आहे, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. मला प्राचार्य डॉ.भास्कर शेळके सरांच्याबद्दल अपार प्रेम आणि विशेष आस्था आहे, कारण ज्ञानाची वाट दाखवताना त्यांनी अतिशय मोकळेपणा आणि प्रांजळपणा दाखविला म्हणूनच मला हे शोधकार्य करणे सोपे झालेले आहे. त्याबद्दल त्यांचा ऋणनिर्देश करण्याऐवजी त्यांच्या ऋणातच राहणे मला योग्य वाटते. प्रत्यक्ष संशोधन कालखंडात सरांचा प्रेमळ सहवास लाभलेला आहे. तो उत्तरोत्तर अधिकाधिक वृद्धिंगत होत जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना आहे. या संशोधन कालखंडात मी डॉ.शेळके सरांच्या कुटुंबातीलच एक सदस्य बनलो होतो. प्राचार्य डॉ.भास्कर शेळके यांच्या पत्नी सौ.तारा शेळके मॅडम, त्यांचे चिरंजीव व स्नुषा डॉ.अविनाश शेळके आणि सौ.डॉ.तृप्ती शेळके यांनी सुद्धा बहुमोल मार्गदर्शन केलेले आहे. त्यानिमित्ताने मी त्यांचेही हार्दिक आभार मानतो. डॉ.विजया देव यांच्या उपयुक्त आणि प्रोत्साहनपर चर्चेमुळेच मी या विषयाच्या अभ्यासासाठी प्रवृत्त झालो. त्यांच्यामुळेच मराठी साहित्यातील आगळ्यावेगळ्या अशा एका उपक्रमाकडे पाहण्याची दृष्टी मला लाभलेली आहे. त्याबद्दल त्यांचाही मी शतशः आभारी आहे.

हा शोधप्रबंध लिहित असताना मला अनेक गुरूवर्यांनी मोलाचे सहकार्य केलेले आहे. ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आदरणीय गुरुवर्य डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, माजी कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, डॉ.अविनाश सांगोलेकर, मराठी विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, प्रा.डॉ.विद्यागौरी टिळक, डॉ.अविनाश आवलगावकर, प्रा.डॉ.तुकाराम रोंगटे, प्रा.डॉ.प्रभाकर देसाई यांनी दिलेले प्रोत्साहन अतिशय महत्त्वाचे ठरलेले आहे. त्यांनी संशोधन कार्यात मला विशेष मौलिक सहकार्य केल्याबद्दल अंतःकरणपूर्वक त्यांचे आभार मानतो.

संदर्भग्रंथ हा संशोधनाचा अविभाज्य घटक असतो. ग्रंथपाल हे संशोधकाचे मार्गदर्शक-मित्र असतात. संशोधनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री गोळा करताना मला मुख्यतः मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, पुणे शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, सावित्रीबाई फुले पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणे, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, सांगली (जिल्हा) नगरवाचनालय, सांगली इत्यादी ग्रंथसंग्रहालयांचे ग्रंथपाल आणि कर्मचारीवृंद यांनी आवश्यक ते सर्व संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. मा.यशवंत श्रीपाद रास्ते यांनी व्यंकटेश माडगूळकर यांच्या समग्र वाङ्मयाची सूची उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचाही मी विशेष आभारी आहे. तसेच मा.श्री.प्रकाश भातंब्रेकर, विभागीय सचिव, साहित्य अकादमी, प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांनी सुद्धा साहित्य अकादमीच्या बद्दल इत्यंभूत माहिती असलेले 'साहित्य अकादमी सामान्य विवरण' हे पुस्तक उपलब्ध करून दिल्यामुळेच 'साहित्य अकादमी : स्वरूप आणि कार्ये' या पहिल्या प्रकरणाची मांडणी करणे मला शक्य झालेले आहे. याबद्दल त्यांचाही मी शतशः आभारी आहे.

मा.तुकाराम काळे, संचालक, श्री सिद्धेश्वर सहकारी बँक लि., सोलापूर आणि सौ.गोदावरी काळे यांच्या ऋणातून मला कधीच मुक्त होता येणार नाही. माझ्या बाबतीत ते सतत वाढतच जाणारे घटित आहे. त्यांचेही आभार मानणे मी माझे परम कर्तव्य समजतो. पीएच्.डी.च्या संशोधन कालावधीमध्ये माझी पत्नी सौ.अंबिका(वैष्णवी) हिने समर्थपणे कौटुंबिक जबाबदारी सांभाळल्यामुळेच आणि प्रबंधाची लेखनसंहिता तयार करीत असताना अनमोल सहकार्य केलेले असल्यामुळेच मी हे संशोधनाचे कार्य समाधानकारकपणे पूर्ण करू शकलेलो आहे. अन्यथा संशोधनाचे काम अजूनही काही कालावधीसाठी लांबू शकले असते. या संशोधनाच्या कामामध्ये तिचा सिंहाचा वाटा आहे याची मला प्रेमळ जाणीव आहे. माझी सुकन्या कु.अपूर्वा आणि चिरंजिव अर्णव या बालचमूंचा प्रेमळ सहवासही मला प्रेरणा देणारा आणि प्रोत्साहन देणारा ठरलेला आहे. प्रत्यक्ष

संशोधन कालखंडातील त्यांचा जिद्दी खोडकरपणा संशोधनाचे कार्य पूर्णत्वास जावयाच्या प्रसंगी आनंददायक वाटतो आहे.

माझ्या पीएच्.डी. संशोधनासाठी माजी विद्यार्थिनी कु.श्रेया देशपांडे हिने खूप मौलिक सहकार्य केलेले आहे. तिने संशोधनाच्या अनुषंगाने आवश्यक ते दुर्मिळ संदर्भग्रंथ आणि साधनसामग्री विविध ग्रंथालयातून उपलब्ध करून दिल्यामुळेच मला संशोधनाचे हे काम करणे सहज सुलभ झालेले आहे. तसेच तिने शुद्धलेखन आणि मुद्रितशोधनाच्या कामात मोलाची मदत केलेली आहे. त्याबद्दल मी तिचा विशेष आभारी आहे. मा.सौ.सुनिता देशपांडे, मा.श्री.पुरुषोत्तम देशपांडे आणि पुष्कर (भैय्या) देशपांडे या मान्यवरांनीही प्रत्यक्ष संशोधन कालावधीत केलेली मदत अनमोल आहे. त्यांच्या प्रेरणा, प्रोत्साहन व मार्गदर्शनामुळेच मी हे संशोधनाचे कार्य पूर्ण करू शकलेलो आहे. त्याबद्दल मी त्यांचाही मनःपूर्वक आभारी आहे.

माझ्या शिक्षणासाठी अहोरात्र काबाडकष्ट करणारे माझे काका कै.गुरूसिद्ध(अप्पा) हराळे, महादेव हराळे, मच्छिंद्र हराळे, ज्योतिबा हराळे, दत्तात्रय हराळे, यशवंत हराळे, परमेश्वर हराळे, आणि माझे आई-वडील या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभलेलेआहे, त्याबद्दल त्यांच्याविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो. बाळासाहेब हराळे, नवनाथ हराळे, रेवणसिद्ध हराळे, शंकर हराळे, विष्णू हराळे, संतोष हराळे, ब्रह्मदेव हराळे, कृष्णात हराळे, विनायक हराळे, विवेक हराळे यांचेही सहकार्य लाभलेले आहे. मला ह्या संशोधनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.बी.कोडग यांनी महाविद्यालयाच्या कामकाजातून विशेष सवलत देऊन बहुमोल सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. मा.षडाक्षरी स्वामी आणि मा. सोमू दुलंगे या मान्यवरांनीही सतत मार्गदर्शन केलेले आहे, त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. प्रा.अमोल खुपसे, प्रा.प्रवीण ताटे, प्रा.गणपत ढेंबरे, प्रा.बाळासाहेब झिंजाडे, प्रा.रूपेश शहा, प्रा.तुकाराम शिरसट, प्रा.डॉ.भारत कचरे, श्री.अमित फडके, श्री.सुकुमार चौगुले या मित्रवर्यांनी सतत प्रेरणा आणि प्रोत्साहन दिलेले आहे. त्याबद्दल त्यांचाही मी विशेष आभारी आहे.

'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्या : एक वाङ्मयीन अवलोकन' (१९६० ते २००७) हा माझ्या पीएच्.डी.च्या संशोधनाचा विषय अतिशय व्यापक आणि पाऱ्यासारखा तरल आहे याची मला पूर्णतः कल्पना आहे. संशोधन ही अव्याहतपणे आणि सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. कोणतेही संशोधन (अभ्यास) हे कधीही परिपूर्ण होत नसते. ज्ञानातूनच ज्ञानाचा प्रवास अखंडपणे होत असतो. म्हणूनच आपणही माझ्या ह्या संशोधनाकडे संत ज्ञानेश्वर यांनी म्हटलेल्या 'अधिक ते सरते। न्यून ते पुरते।।' या उक्तीप्रमाणे या प्रबंधाकडे

पाहाल असा मला आत्मविश्वास आहे. माझ्या ह्या संशोधनात काही उणीवा असल्यास त्याचा मी नम्रपणे स्वीकार करतो.

प्रबंधाची लेखनसंहिता लिहून पूर्ण झाल्यानंतर अतिशय देखण्या अशा नव्या टाईपमध्ये विशेष आपुलकीने आणि काळजीपूर्वकपणे सुबक अक्षरांमध्ये मुद्रणप्रत तयार करून दिल्याबद्दल माझे परमस्नेही श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे यांचा मी विशेष आभारी आहे. अक्षर जुळणी, मांडणी आणि मुद्रणदोष तपासून लेखन निर्दोष करण्याचा प्रयत्न या जिकिरीच्या आणि श्रमाच्या कामामध्ये त्यांनी मौलिक सहकार्य केल्याबद्दल त्यांचा मी मनापासून आभारी आहे.

तसेच माझे हितचिंतक, स्नेही, सहाध्यायी, मित्र-मैत्रिणी आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केलेल्या सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे मी शतशः आभार मानतो.

स्थळ : पुणे

दिनांक : ०९ नोव्हेंबर,२०१५

**प्रा. गणपत हराळे**

**साहाय्यक प्राध्यापक,**

**गणपतराव आरवाडे वाणिज्य महाविद्यालय**

**सांगली.**